स्थायी समितीच्या **गुरुवार दिनांक** 18–02–2016 रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे | सभापती |
| 2. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 3. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 4. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 5. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 6. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 7. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 8. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 9. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 10. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 11. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 12. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 2. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 3. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. जयंत दांडेगावकर, अति. उपायुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 648:– महानगरपालिका सर्व साधारण सभा ठराव क्र.72 दि.04/03/2015 अन्वये चालू आर्थीक वर्ष 2015–16 करीता दि.01/04/2015 पासून मालमत्ता कर नविन निर्धारण प्रणाली लागू केली आहे नविन निर्धारण प्रणाली सोपी असल्याने कोणताही साक्ष नागरीक आपले मालमत्तेचे मालमत्ता कर निर्धारण स्वत: करू शकतो, त्यामुळे महानगरपालिका सीमेतील नागरीकांनी आपले मालमत्तेचे मालमत्ता कराचे स्वयंमुल्यनिर्धारण करून मालमता कर दि.31/03/2016 पर्यंत म.न.पा. खात्यात जमा करावा हयाकरीता प्रोत्साहीत करणेहेतू मालमत्ता कराच्या सामान्य करात 5% सुट देणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 649</u>:— प्रभाग क्र. 69 ब अंतर्गत खामला रोड ते रिंग रोड, व्यंकटेशनगर व पांडे लेआऊट येथे रस्त्याचे डांबरीकरणाचे काम करण्यास्तव प्राप्त मे. आर. एम. दयारमानी यांची मुळ प्राकलनीय राशी रू. 32,17,072/— ची निविदा **3.75** प्रतिशतने अधिक दराची रू. **33,37,712**/— (अक्षरी तेत्तीस लक्ष सदतीस हजार सातशे बारा फक्त) रक्कमेची सुधारीत निम्नतम निविदा स्वीकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 650</u>:— प्रभाग क्र. 72 क अंतर्गत पुराणीक चौक ते सोनेगाव पर्यंत रस्त्याचे डांबरीकरणाचे काम करण्यास्तव प्राप्त मे. अमृत कन्स्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय राशी रु. 41,04,228/— ची निविदा 3.68 प्रतिशतने अधिक दराची रु. 42,55,264/— रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्वीकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 651</u>:— प्रभाग क्र. 32 ब सतनामी नगर येथे शंभरकर ते श्री. वंजारी यांचे घरापर्यंत सिमेंट काँक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. संतोष खरपकर यांची 15.89 टक्के कमी दरांची रु. 39,32,230/— रकमेची निम्नतम निविदा स्वीकृत करण्यासह सन 2015—16 या आर्थिक वर्षात पद क्र. A42001470511 अंतर्गत तरतूद उपलब्ध करुन देण्यास प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 652</u>:— प्रभाग क्र २३ ब येथे विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदा पैकी मे. प्रेमचंद राचुमल यांची निन्मतम निविदा मूळ प्राकलनीय दरापेक्षा ३.७९% अधिक दराची निविदा राशी रू. ३४७६७१२/— असल्याने मंजूरी प्रावधाना पर्यंत म्हणजे रू. ३३,५०,०००/— पर्यंत काम करण्याचे अटिवर निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 653</u>:— प्रभाग क्र. २५—अ येथे भरतनगर येथील अंतर्गत रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. ओ. जी. बजाज यांची मुळ प्राकलनीय दरांपेक्षा ३.६० प्रतिशत अधिक दराची रू. ३०,०४,०८५/— दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 654</u>:— प्रभाग क्र. २४—अ मानवसेवानगर व गौरखेडे कॉम्पलेक्स येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. आर. एम. गोपलानी यांची मुळ प्राकलनीय दरांपेक्षा ३.५० प्रतिशत अधिक दराची रू. २६,८४,४९०/— दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 655</u>:— मध्य नागपूर विधानसभा क्षेत्रातील प्रभाग क्र. 27 येथील श्री. पोद्यारेश्वर राम मंदीर "C" तिर्थक्षेत्र म्हणून विकसीत करण्यास्तव रू. 4,86,17,008/— रक्कमेच्या प्रकालनास तसेच या कामाकरीता म.न.पा. च्या वित्तीय सहाय्या करीता मंजुरी प्रदान करणे. तसेच या कामास्तव आर्कीटेक्ट भिवगडे ॲन्ड असोसिएट्स यांची प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार म्हणून नेमणूक करण्याचा प्रश्न विचारात घेऊन, त्याचप्रमाणे तिर्थक्षेत्राचे विकास कामाचे प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 656</u> :— स्वामी विवेकानंद स्मारक, अंबाझरी ओव्हर फ्लो पॉईंट जवळील विविध स्थापत्य कामे करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी **मे. सायली कन्ट्रक्शन** यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा **१६.५ प्रतिशत कमी** दराची **रू.** २८,५१,२०५/— दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 657</u>:— प्रभाग क्र. 36—अ, मधील संघर्षनगर झोपडपट्टी येथील नाल्याच्या भिंतीची दुरूस्ती करण्यास्तव रू. 29,75,022/—रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र. A43901371913 मधून तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 658</u>:— प्रभाग क्र. 45 अ, वाठोडा गाव खरबी पानधन रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. आर.एम. गोपलानी, यांची प्राकलनीय दरापेक्षा 1.50 टक्के अधिक दराची रू. 30,39,071/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 659</u> :— लकडगंज झोन क्र. ०८, प्रभाग क्र. ३२ ब अंतर्गतब येणाऱ्या सतनामी नगर, सुदर्शन नगर, स्विपर कॉलनी दानागंज, क्वेटा कॉलनी, सिमेंट रोड मालधक्का, लकडगंज पोलीस क्वार्टर जवळ येथे विविध ठिकाणी ६ मी. खांब व फिटिंग तसेच घास बाजार रामपेठ येथे १२.५ मी. आणि लकडगंज बरबटे बगीच्या जवळ येथे १६ मी. हायमास्ट लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरीता ई-निविदा बोलविल्या असता, प्राप्त पाच (५) निविदांपैकी, में. सोनु इलेक्ट्रीकल, नागपूर यांची प्राकलनीय दरापेक्षा १७.१७% ने कमी असलेली निम्नतम दराची म्हणजे रु. ३६,०३,५६७/- ची मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 660</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर